Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - A

## Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor:**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

ISSN : 2278-9308
March, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मानवाधिकार आणि तुरुंगातील महिला संरक्षण — **डॉ. रतन व्ही. राठोड** | 1 |
| 2 | मानवी हक्कांच्या संदर्भात महिला सुरक्षितता — **डॉ. संदीप बी. काळे** | 4 |
| 3 | भारतीय संविधान आणि महिला अधिकार — प्रा. पी. आर पाचपुते | 8 |
| 4 | समाजातील स्त्रीयांचे स्थान/दर्जा व भुमिका — प्रा.डॉ.प्रमिला डी.भोयर | 12 |
| 5 | पंचायत राज आणि महिलांचे नेतृत्व — प्रितम लहानू मोरे | 17 |
| 6 | महिला सबलीकरणाच्या योजना व कार्यक्रम — प्रा. डॉ. एस. एन. देशमुख | 22 |
| 7 | स्वतंत्र भारतातील महिलांचे हक्क — प्रा. विनोद म. पुनवटकर | 26 |
| 8 | महिलांचा विकास आणि मानवाधिकार — प्रा.डॉ. राजू अंबाडकर | 29 |
| 9 | ग्रामीण महिला विकास आणि शासकीय योजनांची फलश्रुती — प्रा.डॉ.राखी श्रीराम तुरसकर | 32 |
| 10 | स्त्री—मुक्ती चळवळीत डॉ. बाबासाहेबआंबेडकरांचे योगदान — प्रा. भारती दिगांबर रत्नपारखी / प्रा. जगदीश रामदास चिमूरकर | 36 |
| 11 | महिलांचे आर्थिक सबलीकरण — प्रा.डॉ. निलम एम. छंगाणी | 41 |
| 12 | भारतीय स्त्रियांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन — डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे | 45 |
| 13 | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग — डॉ. सचिन महादेव पाटील | 50 |
| 14 | भारतातील महिलांची साक्षरता आणि महिलांचे सबलीकरण — प्रा.संजय सी. गिऱ्हेपुंजे | 59 |
| 15 | ग्रामीण महिला उद्योजक आणि सक्षमीकरण — **प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर** | 65 |
| 16 | महिलांचा राजकारणतील सहभाग : आंतरराष्ट्रीय अध्ययन — **प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे** | 69 |
| 17 | सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीमुक्तिसाठी शैक्षणिक योगदान — प्रा.डॉ.शहनाज शेख | 73 |
| 18 | मानवी हक्क आणि महिला — **प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव** | 76 |
| 19 | मानवी हक्क आणि महिला विकासाच्या संधित अनेक कायदे — प्रा. डॉ. उमेशकुमार पी. शहारे | 79 |
| 20 | स्त्री सुंता : कारणे, परिणाम व उपाय — **डॉ. शेख फारुक नजीर / प्रा. रुपसी दास** | 83 |
| 21 | महिला: उद्योजकतेकडून सक्षमीकरणाकडे — मोरेश्वर भिकाजी शेन्डे | 89 |

| | | |
|---|---|---|
| 22 | स्त्री आणि पर्यावरण — एक तात्विक बाजू स्मिता बैतुले | 94 |
| 23 | महिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान प्रा.प्रफुल ई. ढोके | 98 |
| 24 | शिक्षण व महिलांचे कायदेविषयक हक्क डॉ.दयाराम दुधाराम पवार | 101 |
| 25 | महिलांचे अधिकार :स्वरूप आणि वास्तव निता दत्तू घडलिंग | 105 |
| 26 | पंचायतराज मध्ये महीलांचे सक्षमीकरण आणि स्वावलंबन प्रा.डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 109 |
| 27 | भारतातील स्त्रीवादी चळवळ **प्रा.संजय अंकुशराव जगताप** | 114 |
| 28 | राजकारणात महिलांच्या समानतेचा संघर्ष डॉ. अरविंद सोमनाथे | 117 |
| 29 | भारतीय सर्वोच्च मार्गदर्शिका निर्माण कार्यात स्त्रियांचे योगदान **प्रा. डॉ. सुनिता शं. कुरूडे** | 121 |
| 30 | अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्त्रियांचीस्थिती **सुवर्णा ज्ञानेश्वर सोनुने** | 126 |
| 31 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार प्रा. सिध्दार्थ बी. टेंभूर्णे | 129 |
| 32 | भारतीय राज्यघटना आणि महिला अधिकार **शेख उजमा खलील** | 133 |
| 33 | राजकीय पक्षात महिलांची भूमिका **उज़मा ऐनोद्दीन सिद्दीकी** | 136 |
| 34 | महिलांचे मानवाधिकार डॉ. वकील टी. शेख | 140 |
| 35 | महिला सक्षमीकरण — एक अवलोकन डॉ. हिराचंद चोखाजी वेस्कडे | 145 |
| 36 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार व कायदे डॉ. विजया एच. राऊत | 149 |
| 37 | स्त्री सक्षमी करण्याकरीता शासनाच्या योजना प्रा. विलास मेश्राम | 156 |
| 38 | स्त्री—भ्रूणहत्या: एक सामाजिक प्रश्न डॉ. विनोद बी. खेडकर | 160 |
| 39 | पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग **प्रा. मनोहर शामराव वागतकर** | 165 |

# शिक्षण व महिलांचे कायदेविषयक हक्क

डॉ.दयाराम दुधाराम पवार
सहायक प्राध्यापक,शिक्षणशास्त्र विद्याशाखा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ,नाशिक

- प्रस्तावना :

शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वांगीण साधन आहे .शिक्षणामुळे व्यक्तीला त्याच्या अंगी असलेल्या विविध क्षमता, कौशल्यांचा विकास करता येतो . शिक्षण हे व्यक्ती ,समाजाला व देशाला प्रगतीपथावर नेण्याचे मार्ग आहे . शिक्षणामुळे व्यक्ती समृध्द होतो . शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये लोकशाहीचे मूल्य रुजतात. त्यांच्यात न्याय,समानता, बंधुता ह्या मुल्यांची रुजवणुक होते . स्त्री पुरुष असा भेदाभेद न मानता ते सर्व समानतेने राहू लागतात . मुळात स्त्री पुरुष ही निसर्गाने केवळ जैविक दृष्टया वेगळेपण सोडल्यास ते समान आहेत . ज्याप्रमाणे पुरुष आज सर्व क्षेत्रामध्ये प्रगती करीत आहे. त्याचप्रमाणे स्त्रीया देखिल त्यांचा प्रगतीचा आलेख उंचावर नेत आहेत . एवढे असून देखिल आज विकसीत देशाच्या तुलनेले विकसनशील देशामध्ये स्त्रीयांचे प्रश्न अजुनही पाहीजे त्या प्रमाणात सुटलेले नाहीत . आपल्या देशाचा विचार केल्यास स्त्रीयांना राज्यघटनेने विविध अधिकार व कायदे बहाल केलेले आहेत. त्या कायद्याची त्यांना ओळख करुन देण्यास शिक्षणाची भूमिका महत्वाची आह . शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीयांना वा महिलांना त्यांना असलेले महिला महणून जे कायदेविषयक हक्क आहेत त्याची ओळख होणे महत्वाचे आहे .

' स्त्री जन्म ही तुझी कहानी, हदयी अमृत नयनी पाणी ' अशी स्त्री जन्माचे वर्णन केले जाते. स्त्रीयांनी अन्याय सहन करावा , तिने शोषिक असावे , तिने तिच्या इच्छा आकांक्षाना मुरड घालायला हवी , इतरांच्या इच्छाचा आधी विचार करायला हवा अशी अपेक्षा पुरुषप्रधान संस्कृती कडून होत असते . वास्तविक पाहता समाज रथाची स्त्री पुरुष ही दोन चाके आहे . मग ही दोन्ही चाके सुयोग्य रितीने चालणे गरजेचे आहे .आज स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडून अंतराळात झेप घेतलेली आहे . परंतू हा जो तिचा प्रवास आहे तो तितकासा सोपा नव्हता तिने खुप संघर्ष करुन हा टप्पा गाठलेला आहे . तिच्या ह्या संघर्षात व विकासाच्या प्रवासात सहाय्यभूत असलेले विविध समाजसुधारक तसेच कायदे ह्यांचा मोलाचा वाटा आहे. तिच्या ह्या संघर्षात सखा मित्र म्हणून सहाय्यभूत ठरलेले समाजसुधारक व कायदे तिच्या पाठीशी भक्कमपणे उभे असतात .

ज्याने कधी सुर्योदय बघीतलाच नाही त्या व्यक्तीस अंधाराची भीती वाटत नाही . काहीशी अशीच गत स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांची होती . भारतीय स्त्रिया चूल आणि मूल अशा जाळयात अडकलेल्या असतांना महात्मा फुले , सावित्रीबाई फुले , आगरकर इत्यादीं आदीनी स्त्रियांना घराबाहेर आणून त्यांना शिक्षण देवून एका नवीन जगाची निर्मिती करुन दिली . त्यांना स्वावलंबी बनावे तसेच स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न केले .

· I measure the progress of community by the degree of progress which women have achieved समाजात स्त्रिची कितपत प्रगती झाली आहे यावरुन मी त्या संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आलेख ठरवतो हे वाक्य बाबसाहेब आंबेडकराचे त्यांच्या मनात स्त्रियांबाबत असलेला आदर स्पष्ट करतात. बाबासाहेबांनी स्त्रियांना कायदेशिर अधिकार मिळवून दिले . हे कायदे गरजवंत स्त्रियापर्यंत पोहचतात का किंबहूना ह्या कायद्याबाबत तिला माहिती आहे का ? ह्या महिलाविषयक कायद्याची

ISSN : 2278-9308
March, 2021

अंमलबजावणी कशी करावी ह्याची माहिती तिच्यापर्यंत पोहचली आहे का असे अनेक गहन प्रश्न आहेत तेंव्हा सर्वप्रथम ह्या कायद्याबाबत स्त्रिला माहिती करुन देणे गरजेचे वाटते दृ

**महिलांसाठीचे विविध कायदे :**

स्त्रियांसाठी वेळोवेळी अनेक कायदे तयार करण्यात आलेले आहे . जेंव्हा ती एक मुलगी , माता,पत्नी म्हणून वावरत असतांना ज्या समस्या अडचणी तिला उदभवतात त्यांच्या वर मार्ग काढण्यासाठी कायदे तयार करण्यात आलेले आहे . तरी देखिल समाजात स्त्रियांवर अन्याय , अत्याचार होतांना दिसून येतात . किंबहूना त्यात वाढ होत चालली आहे तेंव्हा स्त्रियासाठी हे कायदे समजून घेणे आवश्यक आहे .

**हुंडा प्रतिबंधक कायदा :** हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ च्या ह्या कायद्यानूसार हुंडा देणे आणि घेणे हे दोन्ही भारतीय कायद्याच्या अंतर्गत गुन्हा आहे . हा कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड संहितेच्या ३०४ ( ख) आणि ४९८ (क) हे दोन नवीन कायदे अंतर्भूत करण्यात आली आहेत .

महिला व बालविकास विभाग ह्याच्याकडील शासन निर्णयानूसार जिल्हा स्तरावर हुंडा प्रतिबंधक सल्लागार मंडळ स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत . महिलेचा विवाह झाल्यानंतर सात वर्षाच्या आत तिचा संशयास्पद मृत्यू झाल्यास भारतीय दंड सहिता कलम ३०४ ब अन्वये हुंडाबळीचा गुन्हा संबंधितावर दाखल होवू शकतो.

**महिला संरक्षण कायदा महिला संरक्षण कायदा** : महिला संरक्षण कायदा महिला संरक्षण कायदा हा स्त्रिला कौटुंबिक , आर्थिक , शारीरिक व सामाजिक संरक्षण देतो . हा कायदा फक्त पुरुषाविरुध्दच लागू होतो . यात अंतरीम आदेश देणे , नुकसान भरपाई देणे , संरक्षण अधिकाऱ्याची नियुक्ती करणे , कायदेशिर व वैद्यकीय मदत देणे , भागीदारीच्या घरात राहण्याचा अधिकार देण्याची तरतूदही ह्याअंतर्गत करण्यात आलेली आहे

**बालविवाह प्रतिबंधक कायदा बालविवाह प्रतिबंधक कायदा** : बालविवाह प्रतिबंधक कायदा हा कोणत्याही मुलीचा विवाह ती सज्ञान झाल्याशिवाय म्हणजेच तिच्या वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्याशिवाय विवाह करणे हा बालविवाह अधिनियम १९२९ कलम ३,४,५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा आहे . ह्यामागील उद्देश बालविवाहाची प्रथा बंद करणे हा होय

**विनयभंग करणयासंबंधी कायदा :** ह्या कायद्यानूसार कोणत्याही महिलेसमोर तिला लज्जा उत्पन्न होईल असे कोणतेही कृत्य केल्यास भारतीय दंड सहिता कलम ३५४ अन्वये विनयभंग केल्याप्रकरणी शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे . तसेच विनयभंग केल्याबद्दल भारतीय दंड संहिता कलम ५०९ अंतर्गत पोलीसात तक्रार दाखल करता येते .

**अश्लिलनाविरोधी कायदा :** अश्लिलनाविरोधी कायदा भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ ते २९४ मध्ये महिलांशी अश्लिल वर्तन करणाऱ्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो . स्त्रियांना असभ्य रीतीने प्रदर्शित करणारे कोणतेही पुस्तक , लिखित मजकूर , पत्रक , स्लाईड , फिल्म तयार करणे किंवा विकणे प्रदर्शित करणे प्रतिबंध अधिनियम १९८६ कलम ६ अन्वये शिक्षेस पात्र आहे .

**संपत्ती समान हक्क अधिकार** : अनेकदा महिलावर संपत्तीवरील हक्क सोडण्यासाठी दबाव टाकल्या जातो. १९५६ मध्ये निर्माण झालेल्या हिंदू उत्तराधिकारी कायद्यानूसार महिलांना संपत्तीमध्ये समान अधिकार देण्यात आला आहे . भारतीय स्त्रिला एकत्र कुटूंबाच्या संपत्तीतसुध्दा वाटणी मागता येते . स्त्रियांना मुलाप्रमाणेच वडीलोपार्जित संपत्तीमध्ये समान हक्क देण्यात आलेला आहे .

**समान वेतन कायदा :** समान वेतन कायदा समान वेतन कायदयाअंतर्गत स्त्री आणि पुरुषांना एकाच कामासाठी समान वेतन मिळाले पाहीजे . कायद्यानूसार स्त्रियांना रात्र पाळीच्या कामांना बोलवता येत नाही .

**लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा :** नोकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबविण्याकरीता सुप्रीम कोर्टाने काही मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत . तक्रारीच्या निवारण्यासाठी प्रत्येक विभागात महिला अध्यक्षासह अध्र्यापेक्षा जास्त महिला असणारी समीती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत . लैंगिक गुन्ह्यासंबंधित कलम ३७५ व ३७३ नूसार शिक्षा देण्यात येते .

**प्रसुती रजा संबंधित कायदा :** प्रसुती रजा संबंधित कायदयानूसार नोकरी करणाऱ्या महिलांसाठी बाळतंपणासाठी आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी विशिष्ट कालावधीची भर पगारी रजा देण्यात येते . तसेच गर्भपात झाल्यावरही भर पगारी रजा मिळण्याची तरतूद भारतीय संविधानात करण्यात आलेली आहे .

**महिलांच्या विकासासाठी योजना :** महिलांच्या विकासासाठी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात मुलीचे शिक्षण , आरोग्य ह्यामध्ये सुधारणा करुन त्यांचे उज्जवल भविष्यासाठी आर्थिक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत . कन्येच्या जन्माबाबत समाजात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी तसेच ह्यांच्या जन्मदर वाढविण्यासाठी सुकन्या योजना सुरु करण्यात आली होती . ह्याच योजनेचा लाभ कायम ठेवून माझी कन्या भाग्यश्री या नवीन योजनेमध्ये विलीन करण्यात आली आहे.

**घटस्फोटासंबंधीत कायदे :** घटस्फोटासंबंधीत कायदा कलम ४९४ या कायद्यानूसार एकपत्नीत्व बंधनकारक आहे . पहिली पत्नी हयातीत असतांना तिला घटस्फोट दिल्याशिवाय दुसरा विवाह करणे ह्याकरीता शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे .तसेच एखाद्या स्त्रिच्या घटस्फोट झाला असल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वतजवळ ठेवू शकते .मात्र पाच वर्षानंतर कोर्टाच्या निर्णयानूसार मुलांचा पालनकर्ता ठरविल्या जातो .

**महिला आयोग :** महिला आयोग महिलांना संवैधानिक व न्यायिक सुरक्षा आणि अधिकार देण्यासाठी महिला आयोगाची स्थापना ३१ जानेवारी १९९२ रोजी करण्यात आली . प्रत्येक राज्यात महिला आयोग स्थापन करण्यात आलेले आहे . एखादी स्त्री कोणत्याही महिलासंबंधित तक्रारी महिला आयोगाकडे करु शकते . तसेच ह्या महिला आयोगाला कोर्टासमान चौकशी आणि तपासणी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत . महिला आयोग वेळोवेळी सरकारला महिला कल्याणाच्या योजनाही सादर करत असतो .

भारतीय राज्यघटनेनूसार धर्म , वंश , जात, लिंग ,वर्ण किंवा जन्मस्थानावरुन भेदभाव करता येत नाही. घटनेने पुरुष आणि स्त्रिला समानहक्क व अधिकार दिलेले आहेत . शासननिर्णय स परीपत्रक असून सुध्दा त्यांची योग्य अंमलबजावणी कधीकधी होतांना दिसून येत नाही . ह्यामुळे महिला त्यांच्या हक्क आणि अधिकारापासून आजही वंचित असलेल्या दिसून येतात . वरील उल्लेख केलेल्या महिलाविषयक कायदा व अधिकाराच्या संदर्भात माहिती देण्यात आलेली आहे .

**निष्कर्ष :**

महिला जशा घर चालवितात तसेच त्या देशही चालवू शकतात. आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर असतांना दिसून येतात . त्या ज्या खुबीने घर चालवितात त्याच खुबीने त्या त्यांचे कर्तव्य देखिल बजावतात . मग ते विमान उड्डाण असो की एखाद्या बॅंकेचे , शाळेचे व्यवस्थापन असो त्या यशस्वीपणे चालवू शकतात . आज घडीला महिला ह्या उद्योग जगतात देखील अग्रेसर असल्याचे दिसून येते . एकंदरीतच एकविसावे शतक हे महिलांच्या उन्नतीसाठी विकासासाठी महत्वाचे राहीले आहे . आधुनिक भारताला महिला ही ज्ञान विज्ञानाच्या संगतीने देशाला प्रगतीपथावर घेवून जाणार ह्यात काही शंकाच नाही . परंतू ह्या सृष्टीच्या जननीला ह्या जगामध्ये मानाचे स्थान पाहीजे त्या प्रमाणात आज देखिल मिळालेले नाही . त्या आज विविध क्षेत्रात उलेखनिय प्रगती करीत जरी असल्या तरी तिची बऱ्याच ठिकाणी अवहेलना होतांना दिसून येते .

कौटुंबिक बाबतीत देखिल सर्वत्र तिला समान संधी , वागणूक मिळणे आवश्यक आहे . राज्यघटनेनूसार स्त्री पुरुष समानतेचा अधिकार असतांना देखिल तरीही समाजातीली विविध प्रथा , परंपरेला तिला सामोरे जावे लागते .महिला सक्षमीकरण करुन तिचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तिच्यावरील होणाऱ्या अन्यायाला दाद मिळणे आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांनी याकडे काळजीपूर्वक पाहणे आवश्यक आहे . शासनाने जरी महिलांच्या ह्या होणाऱ्या अवहेलना , अन्याय, अत्याचार , असमानतेची वागणूक ह्यासाठी वेगवेगळे कायदे अस्तित्वात आणलेले आहेत परंतू त्यासाठी त्या कायदा , हक्क व अधिकाराची तिला जाणीव करुन देणे व संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाचे कर्तव्य आहे . त्यामुळे महिलांना तिला मिळणाऱ्या व कायद्याने बहाल केलेल्या अधिकाराची जाणीव झाल्यास तिच्यावरील होणाऱ्या अवहेलना व अन्यायाचे प्रमाण कमी होईल . तसेच मुलींचे शिक्षण ,आरोग्य , बालविवाह ,मुलींच्या जन्मदराबाबत समाजामध्ये सकारात्मकता विचार रुजविण्यासाठी मदत होईल . त्यामुळे महिलांचा विकास होईल . महिलांना तिला बहाल केलेले हक्क व अधिकार उपभोगायला दिले म्हणजे समाजाची जबाबदारी संपली असे नाही तर तिला मिळालेले हक्क व अधिकाराची योग्य अंमलबजावणी सुयोग्य होणे जेवढी महत्वाची आहे तितकेच त्यांना सक्षम करणेही महत्वाचे आहे . त्यामुळे समाजापुढे विनंती की आपण सर्वांनी महिलांच्या मानवी हक्क व कायद्याचे हनन होणार नाही यासाठी आपण सर्व कटीबध्द राहून प्रयत्नशिल असले पाहीजे . त्यामुळे तिच्या विकासासोबतचकुटुंब , राज्य व देशाचा विकासास हातभार लागून प्रगती साधता येईल.

**समारोप** : सदरील माहितीच्या आधारे प्रत्येक महिलांना त्यांचे अधिकार व कायद्याने दिलेले कायदेविषयक अधिकाराची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास महिलांना त्यांचे अधिकार व हक्क मिळवून देण्यास मदत होईल व महिलांना त्यांच्या जीवनात यशस्वी होण्याची संधी प्राप्त होईल.

**संदर्भग्रंथ** :


- गोटे शुभांगी , महिला सबलीकरण व स्वरुप व समस्या : औरंगाबाद , वरद पब्लिकेशन
- पाटील एस.पी . संपादक (२०१६) मानव हक्काच्या माध्यमातून महिला सबलीकरणातील आव्हाने : जळगाव , अथर्व प्रकाशन
- भालेराव सुरेश ( २०१३) मानवी हक्क : सद्यस्थिती व आव्हाने : जळगाव , प्रशांत पब्लिकेशन
- मुळे सुरेखा (मार्च २०१०) महिलांच्या विकासासाठी वचनबध्द , लोकराज्य मासिक